**Department of Lifelong Learning and Extension**

**SNDT Women's University, Mumbai**

**Media coverage of various activities conducted during 2019-2020**

# पोलीसबांधवांकरिता पाठविणार राख्या

। रायगड टाइम्स ।

**पाली/बेणस** । एस.एन.डी.टी कुलगुरू महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ. शशिकला वंजारी आणि कुलसचिव डॉ.दीपक देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली आणि आजीवन अध्ययन विभागाच्या प्रमुख डॉ.आशा पाटील यांच्या मार्गदर्शनाने कृतज्ञता या सामाजिक उपक्रमाव्दारे गडचिरोली विभागातील पोलीस बांधवाकरिता रक्षबांधनासाठी राख्या पाठविण्यात येणार आहेत.

अधिकाधिक नागरिकांनी उपक्रमाकरिता सहकार्य करावे, असे आवाहन डॉ.आशा पाटील यांच्याकडून करण्यात आले आहे. ९ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत आजीवन व अध्ययन आणि विस्तार विभाग कार्यालय एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ चर्चगेट येथे या राख्या जमा करण्यात येणार आहेत.

# एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ

आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग
आणि
समाजकार्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने



# ‘कृतज्ञता’...

सामाजिक उपक्रम



आपल्या गडचिरोली पोलिस बांधवांकरीता
**रक्षाबंधनानिमित्त**
राख्या पाठविण्यात येणार असून
आपणही या उपक्रमात सहभागी व्हा!
आपल्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या
पोलिस बांधवांसाठी किमान



## एक राखी

शुक्रवार, दि. ९ ऑगस्ट २०१९ पर्यंत खालील पत्यावर
जमा कराव्यात, ही नम्र विनंती.

पत्ता : आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग कार्यालय,
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट

आपलं महानगर



टू द पॉईंट

# औपचारिक शिक्षणाचा कक्षाभेद!



Mumbai Edition
15 Sep, 2019 Page No. 11
Powered by : eReleGo.com

# एस.एन.डी.टी महिला विद्यापीठात पोस्टर स्पर्धेसह विविध उपक्रम

▶ कर्नाळा : धम्मशील सावंत



सप्टेंबर महिन्यातील चौथा रविवार जागतिक नदी दिन म्हणून साजरा केला जातो. नद्यांच्या संवर्धनासाठी जनमानसात जनजागृती करणे हे ह्या दिनाचे मुख्य उद्दिष्ट्ये आहे. या दिनाचे औचित्य साधून एस.एन.डी.टी महिला विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार तसेच समाजकार्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने पोस्टर बनविण्याची स्पर्धा पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनी यांच्यासाठी आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत ४६ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

नदी आणि प्रदूषण, नदी आणि सण, नदी आणि पूर तसेच पृथ्वी संवर्धनात नद्यांची भूमिका या मध्यवर्ती विषयाला धरून विद्यार्थिनींनी पोस्टर्स तयार केले. नद्यांचे संवर्धन आणि त्यासंदर्भात आजच्या तरुणाईमध्ये एक प्रकारची संवेदनशीलता निर्माण व्हावी तसेच पर्यावरण रक्षणासोबत शास्वत विकास हि संकल्पना रुजावी हा ह्या स्पर्धे मागचा हेतू असल्याचे मत विभागाच्या संचालिका डॉ. आशा पाटील यांनी व्यक्त केले. तसेच भविष्यात असे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम घेण्यात असे मत डॉ. आशा पाटील यांनी व्यक्त केले.

# महिला विद्यापीठात पोस्टर स्पर्धा



**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सप्टेंबर महिन्यातील ४ था रविवार जागतिक नदी दिन म्हणून साजरा केला जातो. नद्यांच्या संवर्धनासाठी जनमानसात जनजागृती करणे हे ह्या दिनाचे मुख्य उद्दिष्ट्य आहे. या दिनाचे औचित्य साधून एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार तसेच समाजकार्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने पोस्टर बनविण्याची स्पर्धा पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनींसाठी आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत ४६ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

नदी आणि प्रदूषण, नदी आणि सण, नदी आणि पूर तसेच पृथ्वी संवर्धनात नद्यांची भूमिका या मध्यवर्ती विषयाला धरून विद्यार्थिनींनी पोस्टर्स तयार केले. नद्यांचे संवर्धन आणि त्या संदर्भात आजच्या तरुणाईमध्ये एक प्रकारची संवेदनशीलता निर्माण व्हावी तसेच पर्यावरण रक्षणासोबत शास्वत विकास ही संकल्पना रुजावी हा ह्या स्पर्धेमागचा हेतू असल्याचे मत विभागाच्या संचालिका डॉ. आशा पाटील यांनी व्यक्त केले. तसेच भविष्यात असे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम घेण्यात यावे असे मत डॉ. आशा पाटील यांनी व्यक्त केले.

पुढारी

# तृतीयपंथीयांच्या समस्येवर एसएनडीटी विद्यापीठ सरसावले

## आज एक दिवसाची परिषद

**मुंबई : प्रतिनिधी**

तृतीयपंथीयांना मान्यता देणारे विधेयक ऑगस्ट २०१९ मध्ये मंजूर झाल्यानंतर त्यांच्या समस्या प्रखरपणे मांडल्या जाऊ लागल्या. मात्र अद्यापही त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी फारसे प्रयत्न होताना दिसत नाही. याच पार्श्वभूमीवर एसएनडीटी विद्यापीठाने राज्य महिला आयोगाच्या सहकार्याने तृतीयपंथीयांच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी विशेष चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

> तृतीयपंथीयांना भेडसावणाऱ्या अडचणी आणि त्यांना समाजात जगण्यासाठी त्यांना पाठिंबा तसेच सामाजिक बळ तयार करणे हे आपले कर्तव्य आहे. यासाठी एसएनडीटी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. विद्यापीठाने त्यांच्यासाठी नुकताच अभ्यासक्रम तयार केला आहे. त्या अभ्यासक्रमांतून त्यांना शिक्षण मिळेल, पण त्यांचे अन्य प्रश्नही लक्षात घेतले पाहिजे. त्यांना स्थिर करण्यासाठी त्यांच्या अन्य प्रश्न समजावून घेण्यासाठी ही परिषद आहे.
>
> **डॉ. शशिकला वंजारी**
> कुलगुरू, एसएनडीटी विद्यापीठ

केंद्र सरकारने मान्यता दिल्यानंतरही तृतीयपंथीयांना पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध होत नाहीत. तृतीयपंथीयांचे शिक्षण, रोजगार, आरोग्य, राहण्याचा अधिकार, सरकारी किंवा खासगी क्षेत्रामध्ये नोकरीच्या संधी यासारख्या अनेक महत्त्वाच्या संधीपासून अद्यापही ते वंचित आहेत. शाळेत प्रवेश घेणाऱ्या तृतीयपंथीयांना शाळा व अन्य विद्यार्थ्यांकडून मिळणारी अपमानास्पद वागणूक, आरक्षणाचा अभाव यामुळे त्यांना त्यांचा विकास करण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे त्यांचे आयुष्य सुकर व्हावे यासाठी एनएनडीटी महिला विद्यापीठामार्फत ६नोव्हेंबरला तृतीयपंथीय : समस्या आणि आव्हाने या चर्चासत्राचे आयोजन केले आहे. या चर्चासत्रासाठी लक्ष्मी नारायण त्रिपाठी उपस्थित राहणार आहे. तसेच प्रिया पाटील, तमन्ना केणे, उर्मी जाधव आणि साध्या पवार हे उपस्थित राहून तृतीयपंथीयांच्या समस्या मांडणार आहेत. तृतीयपंथीयांनी मांडलेल्या समस्यांवर विद्यापीठाच्या विविध विभागाचे विद्यार्थी सखोल अभ्यास

# एसएनडीटीत उद्या तृतीयपंथीयांच्या समस्यांवर राष्ट्रव्यापी चर्चासत्र

मुंबई (प्रतिनिधी) :

महिलांसाठी विविध उपक्रमांचे अभ्यासक्रम राबवून त्यांना स्वावलंबी बनवण्याचे व्रत घेतलेल्या एसएनडीटी (श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी) महिला विद्यापीठातर्फे प्रथमच तृतीयपंथीयांच्या समस्या आणि त्यांच्यासमोरील आव्हाने या विषयावर बुधवारी एक दिवसाचे राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.

चर्चगेट येथील एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या इमारतीतच पाटकर हॉलमध्ये सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणाऱ्या या चर्चासत्राला राज्य महिला आयोगाचे पाठबळ लाभले असून अध्यक्षा विजया रहाटकर सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्याचबरोबर तृतीयपंथीयांच्या हक्कासाठी लढणाऱ्या आचार्य महामंडलेश्वर लक्ष्मी नारायण त्रिपाठी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. या चर्चासत्रास विद्यार्थी, व्यावसायिक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि सामाजिक कार्याची ओढ असणाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. शशिकला वंजारी यांनी केले आहे.



तृतीयपंथीयांच्या समस्या आणि आव्हाने जाणून घेण्यासाठी एसएनडीटी विद्यापीठातर्फे प्रथमच राष्ट्रीय स्तरावर चर्चासत्र आयोजित करण्यात येत असून डॉ. शशिकला वंजारी म्हणाल्या की, तृतीयपंथीयांसमोर अनेक आव्हाने असतात. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. त्यासाठी विद्यापीठातर्फे अभ्यासक्रमही तयार करण्यात आले आहेत. मात्र अॅडमिशन आणि शिष्यवृत्तीपासून त्यांच्यासमोर अनेक अडचणी असतात. अभ्यासक्रमाच्या प्रवेशाला प्रतिसाद चांगला मिळतो, पण नंतर सातत्य राहत नाही. हा लोकांच्या मानसिकतेचा परिणाम असावा. अशा वेळी महिला विद्यापीठाने काम केले नाही तर आणि दुसरे कोण करणार, असा प्रश्नही वंजारी यांनी उपस्थित केला. त्यासाठीच हे राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर आणि ट्रान्स जेंडरसाठी काम करणाऱ्या लक्ष्मी त्रिपाठी यांनाही बोलावण्यात आले आहे. हे चर्चासत्र म्हणजे एक शैक्षणिक परिषद असेल, त्यातून अशी एखादी कल्पना मिळेल की त्याचा तृतीयपंथीयांच्या अभ्यासक्रमासाठी उपयोग होऊ शकेल.

एसएनडीटी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन, विस्तार आणि समाजकार्य विभागाच्या संचालिका डॉ. आशा पाटील म्हणाल्या तृतीय पंथीयांनाही सन्मानाचे जिणे हवे आहे, पण आपण त्यांना देऊ शकतो का, याचा विचार होणेही गरजेचे आहे. त्यांच्या जगण्याचा आधार समाजाकडून हिरावला जातो म्हणून त्यांना ट्रेनमध्ये फिरून लोकांकडून पैसे मागावे लागतात. ते देताना सुद्धा आपली दृष्टी त्यांना कमी लेखण्याचीच असते. एखाद्या सोसायटीमध्ये पहारेकरी म्हणूनही त्यांना काम मिळताना मुश्कील आहे. अजूनपर्यंत समाजाने त्यांची नोंदही घेतली नव्हती. २०११ नंतर शासनाने त्यांची नोंद घ्यायला सुरुवात केली आहे. त्यानंतर त्यांच्या जगण्याचे मार्ग दिसू लागले आहेत. एसएनडीटी महिला विद्यापीठ त्यांच्या जगण्यासाठी शाश्वत मार्ग तयार करणार आहे. या चर्चासत्रातून त्याची दिशा निश्चित होणार आहे. त्यामुळे मोठ्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. पाटील यांनी केले.

---

**आपलं महानगर**

# तृतीयपंथीयांच्या उत्कर्षासाठी एसएनडीटीचा पुढाकार

## चर्चासत्रातून मांडण्यात येणाऱ्या समस्यांवर बनवणार डॉक्युमेंटेशन

खास प्रतिनिधी : मुंबई



Mumbai Edition
5 Nov, 2019 Page No. 4
Powered by : eReleGo.com

---

# एसएनडीटी महिला विद्यापीठातर्फे उद्या तृतीयपंथीयांच्या समस्यांवर राष्ट्रव्यापी चर्चासत्र

**मुंबई, दि. ४ (प्रतिनिधी)** : महिलांसाठी विविध उपक्रमांचे अभ्यासक्रम राबवून त्यांना स्वावलंबी बनवण्याचे व्रत घेतलेल्या एसएनडीटी (श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी) महिला विद्यापीठातर्फे प्रथमच 'तृतीयपंथीयांच्या समस्या आणि त्यांच्यासमोरील आव्हाने' या विषयावर बुधवार, दि. ६ नोव्हेंबर रोजी एक दिवसाचे राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.

चर्चगेट येथील एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या इमारतीतच पाटकर हॉलमध्ये सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणाऱ्या या चर्चासत्राला राज्य महिला आयोगाचे पाठबळ लाभले असून अध्यक्षा विजया रहाटकर सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्याचबरोबर तृतीयपंथीयांच्या हक्कासाठी लढणाऱ्या आचार्य महामंडलेश्वर लक्ष्मी नारायण त्रिपाठी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. या चर्चासत्रास विद्यार्थी, व्यावसायिक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि सामाजिक कार्याची ओढ असणाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. शशिकला वंजारी यांनी केले आहे.

आपलं महानगर

# ट्रान्सजेंडर विधेयकातील त्रुटी केंद्राला कळवणार

खास प्रतिनिधी ▸▸ मुंबई

ट्रान्स जेंडर विधेयकामध्ये काही त्रुटी राहिल्या आहेत. या त्रुटींची पूर्तता करणे गरजेचे आहे. त्यासाठी राज्य महिला आयोगाच्या वतीने या विधेयकाचा सखोल अभ्यास करून काही सूचना केंद्रातील सरकारकडे सादर करण्यात येतील, अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा डॉ. विजया रहाटकर यांनी दिली. मुंबईत एसएनडीटी विद्यापीठाने आयोजित केलेल्या कॉन्फरन्सनंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली.

ट्रान्स जेंडर विधेयकात मालमत्ता हक्क, नातेसंबंध याबाबतची स्पष्टता नाही. त्यामुळे हे विधेयक प्रथमदर्शनी अपूर्ण वाटते. म्हणूनच काही गोष्टींची स्पष्टता येतानाच काही गोष्टी सुधारल्या जाणे हेदेखील गरजेचे आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. त्यासाठीच संपूर्ण विधेयकाचा सविस्तर अभ्यास होण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. तृतीयपंथीयांना वेगळी वागणूक देणे, भेदभाव करणे हे त्यांच्या दैनंदिन अडचणीत भर घालण्यासारखे आहे. अनेकदा समाजातील लोक तृतीयपंथीय व्यक्तींशी मोकळेपणाने बोलतही नाहीत.

उलट त्यांच्या जगण्यात त्रासाची भर घालतात. त्यामुळे समाजातील एक भाग म्हणून यांच्याकडे पाहण्याच्या दृष्टीकोन वाढायला हवा, असे मत रहाटकर यांनी व्यक्त केले. तृतीयपंथीय लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात एचआयव्हीची लागण झालेली आहे. याअनुषंगाने आरोग्याचे दुष्परिणाम पाहता शासकीय स्तरावर योग्य सोयी सुविधा यांनाही मिळण्याची गरज आहे, असे मत त्यांनी मांडले. एप्रिल २०१४ नंतर तृतीयपंथीयांसाठी अनेक बदल घडण्याची सुरूवात झाली. पण बदल घडायला सुरूवात झाल्यानंतर मात्र अत्याचारात वाढ झाली का, या गोष्टीची पडताळणी करणे गरजेचे आहे.

पुढारी

# महिला आयोग तृतीयपंथीयांच्या पाठीशी कायम उभे राहील : रहाटकर

**मुंबई :** तृतीयपंथींना त्यांच्या आयुष्यात येणाऱ्या समस्या व आव्हानांचा सामना करावा लागतो. त्यांच्या या समस्यांवर तोडगा काढून त्यांचे आयुष्य सुकर करण्यासाठी राज्य महिला आयोग तृतीयपंथीयांच्या पाठिशी कायम उभे राहील, असा विश्वास महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी व्यक्त केला. एसएनडीटी विद्यापीठामध्ये बुधवारी झालेल्या तृतीयपंथी : समस्या आणि आव्हाने या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. तसेच तृतीयपंथींयाच्या विकासासाठी काम करत असलेल्या एसएनडीटी विद्यापीठाला त्यांनी एक लाखांची मदतही जाहीर केली.

तृतीयपंथी : समस्या आणि आव्हाने या कार्यक्रमातून तृतीयपंथींयांनी राहणीमान, आरोग्य, स्वच्छतागृह, शैक्षणिक यासंदर्भात मांडलेल्या समस्यांवर अधिक सखोल अभ्यास करण्यात येणार आहे. यातून निघणाऱ्या निष्कर्षातून तृतीयपंथीयांसाठी विशेष कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे एसएनडीटीच्या उपक्रमासाठी रहाटकर यांनी तातडीने १ लाखांची मदतही जाहीर केली.

एसएनडीटी विद्यापीठाने तृतीयपंथीयांच्या शिक्षणासाठी विशेष अभ्यासक्रम सुरू केला आहे. तृतीयपंथींयासाठी असा उपक्रम राबवणारे एसएनडीटी विद्यापीठ हे देशातील पहिले विद्यापीठ असेल. त्यामुळे विद्यापीठाने तृतीयपंथीयांसाठी घेतलेले उपक्रमाला नेहमीच महिला आयोगाकडून पाठिंबा देण्यात येईल. तसेच तृतीयपंथींयांच्या विकासासाठी महिला आयोग, एसएनडीटी विद्यापीठ आणि तृतीयपंथी यांनी एकत्रिक काम करण्याची आवश्यकता असल्याचेही मत त्यांनी व्यक्त केले. तृतीयपंथींयांच्या विकासासाठी महिला आयोगाच्या माध्यमातून मी नेहमीच पुढाकार घेईल, असे त्या म्हणाल्या.

Mumbai Edition
7 Nov, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

भरण्यास दुरूस्त करण्यासाठी पुरेसा वेळ मिळणार आहे. तसेच काहीं त्रुटी असल्यास ११ नोव्हेंबरपासून शाळा सुरू होत असल्याने पुरेसा अवधी मिळणार आहे. असे शिक्षक परीषद मुंबईचे कार्यवाह शिवनाथ दराडे यांनी सांगितले.

परिसर मुंबई- अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गालगतच आहे. महामार्गावर अनेक बार असून तेथे अनैतिक व

# एसएनडीटी महिला विद्यापीठातर्फे आज तृतीयपंथीयांच्या समस्यांवर राष्ट्रव्यापी चर्चासत्र

प्रतिनिधी
■ मुंबई

महिलांसाठी विविध उपक्रमांचे अभ्यासक्रम राबवून त्यांना स्वावलंबी बनवण्याचे व्रत घेतलेल्या एसएनडीटी (श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी) महिला विद्यापीठातर्फे प्रथमच तृतीयपंथीयांच्या समस्या आणि त्यांच्यासमोरील आव्हाने या विषयावर बुधवारी (६ नोव्हेंबर) एक दिवसाचे राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.

चर्चगेट येथील एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या इमारतीतच पाटकर हॉलमध्ये सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणाऱ्या या चर्चासत्राला राज्य महिला आयोगाचे पाठबळ लाभले असून अध्यक्षा विजया रहाटकर सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्याचबरोबर तृतीयपंथीयांच्या हक्कासाठी लढणाऱ्या आचार्य महामंडलेश्वर लक्ष्मी नारायण त्रिपाठी प्रमुख पाहूण्याम्हणून उपस्थित राहणार आहेत.

या चर्चासत्रास विद्यार्थी, व्यावसायिक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि सामाजिक कार्याची ओढ असणाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. शशिकला वंजारी यांनी केले आहे.

तृतीयपंथीयांच्या समस्या आणि आव्हाने जाणून घेण्यासाठी एसएनडीटी विद्यापीठातर्फे प्रथमच राष्ट्रीय स्तरावर चर्चासत्र आयोजित करण्यात येत असून डॉ. शशिकला वंजारी म्हणाल्या की, 'तृतीयपंथीयांसमोर अनेक आव्हाने असतात. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. त्यासाठी विद्यापीठातर्फे अभ्यासक्रमही तयार करण्यात आले आहेत. मात्र अॅडमिशन आणि शिष्यवृत्तीपासून त्यांच्यासमोर अनेक अडचणी असतात.

अभ्यासक्रमाच्या प्रवेशाला प्रतिसाद चांगला मिळतो. पण नंतर सातत्य राहत नाही. हा लोकांच्या मानसिकतेचा परिणाम असावा. अशा वेळी महिला विद्यापीठाने काम केले नाही तर आणि दुसरे कोण करणार, असा प्रश्नही वंजारी यांनी उपस्थित केला. त्यासाठीच हे राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर आणि ट्रान्स जेंडरसाठी काम करणाऱ्या लक्ष्मी त्रिपाठी यांनाही बोलावण्यात आले आहे. हे चर्चासत्र म्हणजे एक शैक्षणिक परिषद असेल. त्यातून अशी एखादी कल्पना मिळेल की त्याचा तृतीयपंथीयांच्या अभ्यासक्रमासाठी उपयोग होऊ शकेल.

एसएनडीटी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन, विस्तार आणि समाजकार्य विभागाच्या संचालिका डॉ. आशा पाटील म्हणाल्या, 'तृतीय पंथीयांनाही सन्मानाचे जिणे हवे आहे. पण आपण त्यांना देऊ शकतो का, याचा विचार होणेही गरजेचे आहे. त्यांच्या जगण्याचा आधार समाजाकडून हिरावला जातो म्हणून त्याना ट्रेनमध्ये फिरून लोकांकडून पैसे मागावे लागतात. ते देताना सुद्धा आपली दृष्टी त्यांना कमी लेखण्याचीच असते. एखाद्या सोसायटीमध्ये पहारेकरी म्हणूनही त्यांना काम मिळणे कठिण असते. अजूनपर्यंत समाजाने त्यांची नोंदही घेतली नव्हती. २०११ नंतर शासनाने त्यांची नोंद घ्यायला सुरूवात केली आहे.

त्यानंतर त्यांच्या जगण्याचे मार्ग दिसू लागले आहेत. एसएनडीटी महिला विद्यापीठ त्यांच्या जगण्यासाठी शाश्वत मार्ग तयार करणार आहे. या चर्चासत्रातून त्यांची दिशा निश्चित होणार आहे. त्यामुळे मोठ्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. पाटील यांनी केले.

मुद्रक आणि प्रकाशक भूषण बी. म्हात्रे यांनी मालक मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.साठी, एस.आर. पब्लिकेशन, लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम
प्रकाशित केले. संपादक - दीपक बी.म्हात्रे. E-mail : vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक

THE ASIAN AGE

Biggest A4
Buy More to Save

Ad closed by Google
Stop seeing this ad
Why this ad?

# SWC TO SUGGEST CHANGES IN TRANSGENDER BILL, 2019

**AGE CORRESPONDENT**
**MUMBAI, OCT. 6**

State Women's Commission chairperson Vijaya Rahatkar on Wednesday said that the commission will suggest a few corrective amendments in The Transgender Persons (Protection of Rights) Bill proposed by the Central government.

Ms Rahatkar was speaking at a conference organised by the SNDT Univerisity. Ms Rahatkar said, "The Transgender Bill, 2019, has many flaws."

"Several topics, including relationships and property rights have not been detailed in the Bill. While a few clauses in the Bill need to be explained, others require correction. After studying the Bill thoroughly, we will submit suggestions and objections to the central government," Ms Rahatkar added.

According to her, sensitization of society is needed to alleviate the problems of transgender people.

"People avoid talking to transgender persons. Few even exploit them. To avoid such instances, we have to sensitize the society," she said.

The chief guest of the conference Acharya Mahamandaleshwar Lakshmi Narayan Tripathi said that the Bharatiya Janata Party-led state government has failed to solve woes of the transgender community in the last five years.

Panellist Priya Patil, meanwhile, said that the previous government had assured to set a separate board for the transgender people, which was never fulfilled. After many follow-ups this government, too, has not done it, she said.

Urmi Jadhav, one of the panellists, said, "We as a transgender community contacted government officials, politicians and ministers but the response was very poor."

# तृतीयपंथीयांना सन्मानाचे जीवन देणार

## राज्य महिला आयोगाच्या विजया रहाटकर यांचा निर्धार




**मुंबई, दि. ६ (प्रतिनिधी)** : ''सर्वसामान्य महिलांना सन्मानाचे जीणे जगण्याचा मार्ग दाखवणाऱ्या एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या सहकार्याने तृतीयपंथीयांनाही सन्मानाचे जीवन जगण्याचा हक्क मिळवून देणार,'' असा निर्धार राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केला.

एसएनडीटी (श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी) महिला विद्यापीठातर्फे प्रथमच तृतीयपंथीयांच्या समस्या आणि त्यांच्यासमोरील आव्हाने या विषयावर बुधवार, दि. ६ नोव्हेंबर रोजी एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्राचे उद्घाटन विजया रहाटकर यांच्या हस्ते झाले. त्यानंतर त्यांनी उपस्थितांशी संवाद साधताना तृतीयपंथीयांच्या समस्यांचा पाढा वाचला. या चर्चासत्रास एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. शशिकला वंजारी, विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन विस्तार आणि समाजकार्य विभागाच्या संचालिका डॉ. आशा पाटील, तृतीयपंथीयांसाठी कार्य करणाऱ्या आचार्य महामंडलेश्वर लक्ष्मीनारायण त्रिपाठी, पॅनेलवर काम करणाऱ्या प्रिया पाटील, उर्मी जाधव, साध्या पवार आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

रहाटकर म्हणाल्या की, ''राज्यात पाच लाखांच्या आसपास असलेले तृतीयपंथीय समाजापासून अलिप्त आहेत. समाजातील भेदभावामुळे त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले आहे. हाताला काम नाही, जगण्याचे साधन नाही. त्यामुळे पदरी अवहेलना येत असून त्यांचे लैंगिक छळ होत आहेत. त्यांना एचआयव्हीची लागण होत आहे. फार भयंकर वाईट अवस्था आहे. 'थर्ड जेंडर' हे निसर्गाचे देणे आहे. शासकीय सवलती मिळत नसल्याने अधिक त्रास होतो. मात्र, त्यांना समान हक्क मिळावेत यासाठी राज्य महिला आयोग काम करत आहे. एसएनडीटी विद्यापीठाने यासाठी पुढाकार घेतला असून महिला आयोग भक्कम पाठिंबा देणार आहे. त्यामुळे यापुढे तृतीय पंथीयांची अवहेलनेतून मुक्तता होईल आणि त्यांना सन्मानाचे जिणे मिळेल,'' असा विश्वासही रहाटकर यांनी व्यक्त केला.

पुण्य नगरी

# ट्रान्स जेंडर विधेयकात मालमत्ता हक्क, नातेसंबंधांबद्दल अस्पष्टता – विजया रहाटकर

**। मुंबई ।** केंद्र सरकारच्या 'ट्रान्स जेंडर' विधेयकात मालमत्ता हक्क, नातेसंबंध याबद्दल स्पष्टता नाही. त्यामुळे संपूर्ण विधेयकाचा सविस्तर अभ्यास होण्याची गरज आहे, असे मत व्यक्त करताना राज्य महिला आयोगाच्या वतीने त्याचा



सखोल अभ्यास करून काही सूचना केंद्रातील सरकारकडे सादर करण्यात येतील, अशी माहिती आयोगाच्या अध्यक्षा डॉ. विजया रहाटकर यांनी दिली. चर्चगेट येथील एसएनडीटी विद्यापीठाने या विधेयकासंबंधी आयोजिलेल्या चर्चासत्रानंतर त्या पत्रकारांशी बोलत होत्या.

हे विधेयक प्रथमदर्शनी अपूर्ण वाटत असून काही त्रुटी राहिल्या आहेत. त्यांची पूर्तता करणे गरजेचे आहे. त्यासाठी काही बाबींमध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे. तृतीयपंथीयांना वेगळी वागणूक देणे, त्यांच्याविषयी भेदभाव करणे, हे त्यांच्या दैनंदिन अडचणीत भर घालण्यासारखे आहे. समाजातील लोक अनेकदा तृतीयपंथीयांशी मोकळेपणाने बोलतही नाहीत. उलट त्यांच्या जगण्यात त्रासाची भर घालतात. त्यामुळे समाजातील एक भाग म्हणून त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वाढायला हवा. एप्रिल २०१४ नंतर तृतीयपंथीयांसाठी अनेक बदल घडण्याची सुरुवात झाली; पण बदलांनंतर त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांत वाढ झाली आहे का, त्याची पडताळणी करणे गरजेचे आहे. या समाजासाठीही साधिकरीत्या सर्वांनी उभे राहणे, वेळोवेळी त्यांच्या अधिकारांसाठी भूमिका घेणे गरजेचे आहे. तृतीयपंथींनाही समान हक्क आणि अधिकार मिळावे, तसेच त्यांचे आयुष्यमानही सर्वसामान्यांसारखे असावे, यासाठी समाज म्हणून लढण्याची गरज आहे. महिला आयोगालाही तृतीयपंथीयांच्या विषयांवर आपले मत, सूचना हरकती मांडण्याचा अधिकार आहे. त्यामुळेच हा आयोग त्यांच्या विषयातही शिफारस करणार आहे. त्यांचाही सशक्त समाज आहे, असा विश्वास तृतीयपंथीयांनाही मिळवून द्यावा लागेल आणि त्यांच्या विषयांसंबंधी जनमतही उभारावे लागेल, असेही त्या म्हणाल्या.

## तृतीयपंथीयांमध्ये मोठ्या प्रमाणात एचआयव्हीची लागण

तृतीयपंथीय लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात एचआयव्हीची लागण झालेली आहे. त्यांच्या आरोग्यावर झालेले दुष्परिणाम पाहता शासकीय स्तरावर योग्य सोयीसुविधा त्यांनाही मिळण्याची गरज आहे. अनेकदा तृतीयपंथीय लैंगिक अत्याचाराचे बळी ठरतात. अशावेळी हादेखील समाज आहे. सर्वसामान्य व्यक्तींसारखाच या समाजालाही न्याय्य, हक्क मागण्याचा अधिकार आहे. ही भावना वाढीस लागायला हवी, असे मत त्यांनी मांडले.

# एसएनडीटी विद्यापीठात फुले पुस्तकपेढी

मुंबई : विद्यार्थिनींमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, तसेच कर्तृत्ववान व्यक्तींचे जीवनचरित्र वाचून समाजकार्याची आवड निर्माण व्हावी, यासाठी एसएनडीटी विद्यापीठाच्या सोशल वर्क विभागातर्फे सावित्रीबाई फुले पुस्तकपेढी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमासाठी विभागाने साहित्यप्रेमी, माजी विद्यार्थिनींनी ग्रंथदान करावे, असे आवाहन केले आहे. एसएनडीटी विद्यापीठामध्ये विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी विविध उपक्रम राबवण्यात येतात. या पुस्तकपेढीची संकल्पना विभागातील शिक्षकांकडून मांडण्यात आली. विद्यार्थिनींना अभ्यासाव्यतिरिक्त अन्य पुस्तके वाचायला मिळणार असल्याने आम्ही ही संकल्पना राबवण्याचा निर्णय घेतला. ही पुस्तकपेढी विद्यार्थिनींसाठी असल्याने त्याचे नाव सावित्रीबाई फुले पुस्तकपेढी ठेवले आहे. विभागाच्या आवाहनाला माजी विद्यार्थिनी व नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, अनेकांनी पुस्तके देण्यासाठी संपर्क साधला असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

# तृतीयपंथियांच्या समस्या सोडविण्यासाठी महिला आयोग सहकार्य करणार

## एसएनडीटी महिला विद्यापीठातर्फे चर्चासत्र



। मुंबई । प्रतिनिधी ।

एस.एन.डी.टी महिला विद्यापीठातर्फे तृतीयपंथीयांच्या समस्यांवरील राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र उत्साहात संपन्न झाले. या राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्राचे उद्घाटन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती विजया रहाटकर, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. शशिकला वंजारी आणि आजीवन अध्ययन आणि विस्तार तसेच समाजकार्य विभागाच्या प्रमुख डॉ. आशा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी तृतीयपंथीयांच्या समस्यांवर राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्राचे आयोजन केल्याबद्दल एस.एन. डी.टी. महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. शशिकला वंजारी आणि आजीवन अध्ययन आणि विस्तार तसेच समाजकार्य विभागाच्या प्रमुख डॉ.आशा पाटील यांचे अभिनंदन केले तसेच भविष्यात या विषयासाठी महिला आयोग नक्कीच एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या सोबत राहील असे नमूद केले. तृतीयपंथीयांना समाजात समानतेची वागणूक मिळाली पाहिजे यासाठी आपण सर्वांनी मिळून विशेष प्रयत्न करायला पाहिजे, असे त्यांनी उपस्थितांना आवाहन केले.

या राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रात प्रमुख पाहुणे म्हणून आचार्य महामंडलेश्वर लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांची उपस्थिती लाभली. आचार्य महामंडलेश्वर लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांनी उपस्थितांशी दिलखुलासपणे संवाद साधला तसेच समाजाने तृतीयपंथीयांना समाजाचा एक घटक म्हणून पाहिले पाहिजे तसेच नवीन पिढी संवेदनशील असून त्यांच्याकडून अपेक्षा असल्याचे तसेच आपल्या आईला आणि मातृभूमीला कधीच विसरू नका असा कानमंत्रसुद्धा दिला.

नंतरच्या सत्रात प्रिया पाटील, उर्मी जाधव तसेच साध्य पवार यांनी तृतीयपंथीयांच्या सामाजिक, उपजीविका तसेच आरोग्य या पैलूंवर चर्चा केली. तसेच चर्चसत्रात उपस्थितांनी विविध प्रश्नांद्वारे तज्ज्ञांकडून माहिती घेतली. भविष्यात तृतीयपंथीयांच्या समस्यांवर अधिक सखोलपणे एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ संशोधन तसेच त्यावर उपाययोजना शोधण्यासाठी विविध उपक्रम हाती घेईल असा विश्वास कुलगुरु डॉ. शशिकला वंजारी यांनी व्यक्त केला.

आपलं महानगर

# सोशल वर्कच्या विद्यार्थिनींसाठी विशेष ग्रंथालय

## एसएनडीटीमध्ये सावित्रीबाई फुले पुस्तकपेढी सुरू

खास प्रतिनिधी ▸▸ मुंबई

विद्यार्थिनींमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी. अभ्यासाव्यतिरिक्त कर्तृत्वान व्यक्तींचे जीवनचरित्र वाचून समाजकार्याची आवड निर्माण व्हावी, यासाठी एसएनडीटी विद्यापीठातील सोशल वर्क विभागातर्फे सावित्रीबाई फुले पुस्तकपेढी सुरू करण्यात येत आहे. या पुस्तकपेढीमध्ये देशविदेशातील थोर व्यक्तींचे आत्मचरित्र, त्यांनी लिहिलेली पुस्तके, संशोधने वाचण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विद्यार्थिंनीना विविध प्रकारची पुस्तके वाचता यावीत यासाठी विभागाकडून माजी विद्यार्थिंनी व नागरिकांना अशी पुस्तके भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

देशातील पहिले महिला विद्यापीठ असलेल्या एसएनडीटी विद्यापीठामध्ये विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवण्यात येत असतात. विद्यापीठातील सोशल वर्क विभागातील विद्यार्थिंनीना शिक्षण घेताना जगातील थोर सामाजिक कार्यकर्त्यांना काम करताना आलेले अनुभव, त्यांच्या समोर आलेली संकटे, त्यावर त्यांनी केलेली मात याची माहिती त्यांना व्हावी, तसेच त्यांच्या कार्यातून त्यांना सामाजिक कार्याचे विविध पैलू समजावेत यासाठी अभ्यासाव्यतिरिक्त सामाजिक व्यक्तींची चरित्र मांडणारी पुस्तके, त्यांनी लिहिलेली आत्मचरित्र, त्यांच्या कार्यावर लिहण्यात आलेली पुस्तके विद्यार्थिनींना उपलब्ध करून देण्याचा निर्णय सोशल वर्क विभागाने घेतला आहे.

एसएनडीटी विद्यापीठाच्या चर्चगेट कॅम्पसमध्ये भली मोठे ग्रंथालय आहे. त्यात अभ्यासाची पुस्तके मोठ्या प्रमाणात असून, विद्यार्थिनी त्यांचा पुरेपुर वापरही करतात. परंतु आर्थिक मान्यता नसलेल्या सोशल वर्क विभागातील विद्यार्थिनींना अभ्यासाव्यतिरिक्त अन्य पुस्तके वाचायला मिळावीत यासाठी ही पुस्तक पेढी सुरू करण्याचा निर्णय सोशल वर्क विभागाकडून सुरू करण्यात आली आहे. या पुस्तकपेढीची संकल्पना विभागातील शिक्षकांकडून मांडण्यात आली. विद्यार्थिंनीना अभ्यासाव्यतिरिक्त अन्य पुस्तके वाचायला मिळणार असल्याने आम्ही ही संकल्पना राबवण्याचा निर्णय घेतला. ही पुस्तकपेढी विद्यार्थिंनीसाठी असल्याने त्याचे नाव सावित्रीबाई फुले पुस्तकपेढी ठेवले असल्याची माहिती सोशल वर्क विभागाच्या प्रमुख डॉ. आशा पाटील यांनी दिली.

विद्यार्थिनींना विविध प्रकारची पुस्तके वाचता यावीत यासाठी विभागाकडून विद्यापीठाच्या माजी विद्यार्थिंनी व नागरिकांना किमान एक पुस्तक देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विभागाच्या आवाहनाला माजी विद्यार्थिंनी व नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, अनेकांनी पुस्तके देण्यासाठी संपर्क साधला आहे. किमान एक पुस्तकाची मागणी आम्ही केली असताना काही नागरिकांनी तीन-चारपेक्षा अधिक पुस्तके देण्याची तयारी दर्शवल्याची माहिती सोशल वर्क विभागाचे सहाय्यक प्राध्यापक अमेय महाजन यांनी दिली.

Mumbai Edition
8 Nov, 2019 Page No. 1
Powered by : eReleGo.com

# एस.एन.डी.टी महिला विद्यापीठात स्वानुभव २०20 उत्साहात संपन्न

**मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) :** एस.एन.डी.टी महिला विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार आणि समाजकार्य विभागाचा 'स्वानुभव २०२०' हा वार्षिक उत्सव संपन्न झाला.



अनौपचारिक शिक्षण आणि विकास ह्या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी एक महिना विविध सामाजिक संस्थांमध्ये क्षेत्रकार्यासाठी जात असतात व तेथे वस्तीपातळीवर महिलांकरिता अनेक कौशल्य विकासाच्या कार्यशाळा भरवून विविध वस्तू तयार करतात व त्याची विक्री स्वानुभव ह्या वार्षिक प्रदर्शनात करतात तसेच समाजकार्य विषयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी विविध सामाजिक संस्थांचे, बचतगटांचे स्टॉल या स्वानुभव मध्ये ठेवतात जेणेकरून ह्या सामाजिक संस्थांनी बनविलेल्या वस्तूंची विक्री होऊन सामाजिक संस्थेस मदत होऊ शकेल व समाजात सामाजिक संस्थांच्या कार्याची जनजागृती होण्यास मदत होते.

ह्या वर्षी स्वानुभव २०२० चे वैशिष्ट्ये म्हणजे रेड स्वस्तिक संस्थेच्या माध्यमातून तृतीयपंथी व्यक्तींनी बनविलेल्या विविध वस्तूंचे स्टॉल तसेच पॅराप्लेजिक फौंडेशनच्या दिव्यांग व्यक्तींनी बनविलेल्या कलाकुसरीच्या वस्तूंचा ह्यात समावेश होता.

स्वानुभव २०२० ह्या वार्षिक प्रदर्शनास मासूम संस्थेच्या संस्थापक श्रीमती. निकिता केतकर ह्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. ह्या विभागाच्या विद्यार्थिनींनी स्वअनुभवातून शिकून वस्तू व खाद्य पदार्थांची विक्री केली.

भविष्यात तृतीय पंथी, दिव्यांग आणि जेष्ठ नागरिक यांच्यासाठी विशेष उपक्रम विभागामार्फत घेण्यात येतील त्यामुळे समाजात ह्या घटकांबद्दल संवेदनशीलता आणि सर्वसमावेशकता निर्माण होईल असा मानस विभागाच्या संचालिका डॉ. आशा पाटील यांनी व्यक्त केला.

पुढारी

# एसएनडीटी 'स्वानुभव २०२०'चा उत्साह

## तृतीयपंथी व्यक्तींनी बनविलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन; दिव्यांगांचाही सहभाग

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार आणि समाजकार्य विभागाचा 'स्वानुभव २०२०' हा वार्षिक उत्सव उत्साहात साजरा झाला. यावेळी रेड स्वस्तिक संस्थेच्या माध्यमातून तृतीयपंथी व्यक्तींनी बनविलेल्या विविध वस्तूंचे स्टॉल तसेच पॅराप्लेजिक फाउंडेशनच्या दिव्यांग व्यक्तींनी बनविलेल्या कलाकुसरीच्या वस्तूंचा यात समावेश होता.

अनौपचारिक शिक्षण आणि विकास या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी एक महिना विविध सामाजिक संस्थांमध्ये क्षेत्रकार्यासाठी जातात. तेथे वस्तीपातळीवर महिलांकरिता अनेक कौशल्य विकासाच्या कार्यशाळा भरवून विविध वस्तू तयार करतात व त्याची विक्री स्वानुभव या वार्षिक प्रदर्शनात केले जाते. समाजकार्य विषयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी विविध सामाजिक संस्थांचे,



बचतगटांचे स्टॉल या स्वानुभवमध्ये ठेवतात. जेणेकरून या सामाजिक संस्थांनी बनविलेल्या वस्तूंची विक्री होऊन संस्थेस मदत होऊ शकेल व समाजात सामाजिक संस्थांच्या कार्याची जनजागृती होण्यास मदत होते. या वर्षी स्वानुभव २०२० चे वैशिष्ट्ये म्हणजे प्रदर्शनास मासूम संस्थेच्या संस्थापक निकिता केतकर यांनी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती दर्शविली. या विभागाच्या विद्यार्थिनींनी स्वअनुभवातून शिकून वस्तू व खाद्य पदार्थांची विक्री केली.

> भविष्यात तृतीय पंथी, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी विशेष उपक्रम विभागामार्फत घेण्यात येतील. त्यामुळे समाजात या घटकांबद्दल संवेदनशीलता आणि सर्वसमावेशकता निर्माण होईल.
>
> **-डॉ. आशा पाटील.**
> संचालिका

Virar-Dahanu Shuttle Edition
17 Feb, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# एस.एन.डी.टी महिला विद्यापीठात स्वानुभव २०२० उत्साहात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

एस.एन.डी.टी महिला विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार आणि समाजकार्य विभागाचा 'स्वानुभव २०२०' हा वार्षिक उत्सव उत्साहाने संपन्न झाला.

अनौपचारिक शिक्षण आणि विकास ह्या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी एक महिना विविध सामाजिक संस्थांमध्ये क्षेत्रकार्यासाठी जात असतात व तेथे वस्तीपातळीवर महिलांकरिता अनेक कौशल्य विकासाच्या कार्यशाळा भरवून विविध वस्तू तयार करतात व त्याची विक्री स्वानुभव या वार्षिक प्रदर्शनात करतात तसेच समाजकार्य विषयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी विविध सामाजिक संस्थांचे, बचतगटांचे स्टॉल या 'स्वानुभव'मध्ये ठेवतात, जेणेकरून या सामाजिक संस्थांनी बनविलेल्या वस्तूंची विक्री होऊन सामाजिक संस्थेस मदत होऊ शकेल व समाजात सामाजिक संस्थांच्या कार्याची जनजागृती होण्यास मदत होते.

यावर्षी स्वानुभव २०२० चे वैशिष्ट्ये म्हणजे रेड स्वस्तिक संस्थेच्या माध्यमातून तृतीयपंथी व्यक्तींनी बनविलेल्या विविध वस्तूंचे स्टॉल तसेच पॅराप्लेजिक फाऊंडेशनच्या दिव्यांग व्यक्तींनी बनविलेल्या कलाकुसरीच्या वस्तूंचा यात समावेश होता. स्वानुभव २०२० या वार्षिक प्रदर्शनास मासूम संस्थेच्या संस्थापक निकिता केतकर या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. या विभागाच्या विद्यार्थिनींनी स्वनुभवातून शिकून वस्तू व खाद्यपदार्थांची विक्री केली. भविष्यात तृतीयपंथी, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी विशेष उपक्रम विभागामार्फत घेण्यात येतील. त्यामुळे



समाजात या घटकांबद्दल संवेदनशीलता आणि सर्वसमावेशकता निर्माण होईल, असा मानस विभागाच्या संचालिका डॉ.आशा पाटील यांनी व्यक्त केला.

# एस.एन.डी.टी विद्यापीठातर्फे

# वेबिनारचे आयोजन

। मुंबई । प्रतिनिधी ।

एस.एन.डी.टी महिला विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग व समाज कार्य विभागाने १३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता 'मानव अधिकार आणि 'कोविड १९' या विषयावर राष्ट्रीय पातळीवर वेबिनारचे आयोजन केले आहे.

या राष्ट्रीय पातळीवरील वेबिनार मध्ये टाटा सामजिक विज्ञान संस्थेचे प्रा.डॉ. विजय राघवन हे सध्या कोरोना संकट काळात कारागृहातील बंदीवान आणि त्यांच्या कुटुंबियांच्या मानव अधिकांराविषयी बोलणार असून घर बचाव घर बनाव संस्थेचे बिलाल खान हेयाच संकटकाळात विस्थापित झालेल्या कामगाराच्या समस्या आणि त्यांच्या संस्थेने केलेल्या उपाययोजना विषयी चर्चा करणार आहेत तसेच टाटा सामजिक विज्ञान संस्थेच्या प्रा.डॉ.विभुती पटेल ह्या कोरोनाच्या काळात स्त्रिया व बालके यांच्या बाबतीत घरगुती हिंसाचार आणि शोषणाच्या वाढलेल्या घटनांचा आढावा घेणार आहेत. ह्या राष्ट्रीय पातळीवरिल वेबिनारचे उदघाटन हे वेबिनारचे प्रमुख पाहूणे म्हणून लाभलेल्या एस.एन.डी.टी महिला विद्यापीठाच्या मा.कुलगुरु प्रा.डॉ.शशिकला वंजारी ह्यांच्या उपस्थीतीत होणार आहे. ह्या वेबिनार मध्ये सामाजिक कार्यकर्ते, वकिल, पोलीस, विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे असे आवाहन संचालिका प्रा.डॉ.आशा पाटील यांनी केले.

---

# एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ तर्फे मानव अधिकार आणि कोविड १९ ह्या विषयावर राष्ट्रीय पातळीवर वेबिनारचे आयोजन

एस.एन.डी.टी महिला विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग व समाज कार्य विभागाने १३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता 'मानव अधिकार आणि कोविड १९' ह्या विषयावर राष्ट्रीय पातळीवर वेबिनारचे आयोजन' केले आहे.

ह्या राष्ट्रीय पातळीवरील वेबिनार मध्ये टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे प्रा.डॉ.विजय राघवन हे सध्या कोरोना संकट काळात कारागृहातील बंदीवान आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या मानव अधिकांराविषयी बोलणार असून. घर बचाव घर बनाव संस्थेचे श्री.बिलाल खान हे ह्याच संकट काळात विस्थापित झालेल्या कामगाराच्या समस्या आणि त्यांच्या संस्थेने केलेल्या उपाययोजना विषयी चर्चा करणार आहेत तसेच टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या प्रा.डॉ.विभुती पटेल ह्या कोरोनाच्या काळात स्त्रिया व बालके ह्यांच्या बाबतीत घरगुती हिंसाचार आणि शोषणाच्या वाढलेल्या घटनांचा आढावा घेणार आहेत.

ह्या राष्ट्रीय पातळीवरिल वेबिनारचे उदघाटन हे वेबिनारचे प्रमुख पाहूणे म्हणून लाभलेल्या एस.एन.डी.टी महिला विद्यापीठाच्या मा.कुलगुरु प्रा.डॉ. शशिकला वंजारी ह्यांच्या उपस्थीतीत होणार आहे.

ह्या वेबिनार मध्ये सामाजिक कार्यकर्ते, वकिल, पोलीस,विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे असे आवाहन संचालिका प्रा.डॉ.आशा पाटील ह्यांनी केले.

ह्या वेबिनार मध्ये सहभागी होण्यासाठी गुगल मीट ॲप डाउनलोड करून खालील लिंक द्वारे https://meet.google.com/zrb-oepq-rwn सहभागी व्हावे.

# INDIAN UNIVERSITY ASSOCIATION FOR CONTINUING EDUCATION

CORDIALLY INVITES YOU TO JOIN

**Discussion on**

# Technology Based Adult Learning & Education

Platform GOOGLE MEET

24 Sep 2020 DATE

03.00 PM

## CHAIR



Prof. Nasreen Rustomfram, Centre for Lifelong Learning, Tata Institute of Social Sciences

https://meet.google.com/zpu-nama-qar

## SPEAKERS



Prof. M.C.Reddeppa Reddy, Director(Retd.)& UGC Emeritus Fellow (2017-20), Department of Adult and Continuing Education, S V University, Tirupati, AP



Dr. N.V.R. Kapali, (Retd.)Prof. & Head, Department of Adult and Continuing Education, University of Madras, Chennai



R. K. Singh, Former Engineer-in-Chief, Doordarshan, Prasar Bharti, Govt. of India



Dr. Asha Patil, Director, Department of Lifelong Learning and Extension, SNDT Women's University, Mumbai


For Info and Support

Prof. JP Dubey *jaipd9@gmail.com*

*Shikha Kumari*+918744018951 *Sagar*+918810248071 *Dheeraj Kumar* +919910467397



COLLEGE OF SOCIAL WORK BADNERA, AMRAVATI
SOCIAL MINDS
ONLINE WEBINAR SERIES FOR STUDENTS
27 May
4:00 PM
100 Seats only
Webinar #2
Org. by, Shivaji Tuppekar
Asst. Professor & Member of Students Development Cell.
विषय:
करिअरच्या वेगळ्या वाटा..
अनौपचारिक शिक्षण आणि विकास
विषयातील करियर च्या संधी
प्रा.डॉ.आशा पाटील
संचालिका
आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग
एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई